# कर्वे रस्त्यावरील संभाव्य वाहतूक समस्येवर 'मेट्रो संवाद'चे आयोजन

पुणे, दि. १४ मार्च, २०१८ : महा मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांच्या वतीने सध्या पुणे शहरात वनाझ ते रामवाडी या मार्गिकेचे काम जोरात सुरू आहे. मेट्रो प्रकल्पाचे हे काम सुरू असताना सामान्य नागरिकांना वाहतुकीच्या अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. याच समस्यांवर जे उपाय केले जाणार आहेत त्याविषयी चर्चा करण्याच्या उद्देशाने महा मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांच्या वतीने येत्या शुक्रवार दि. १६ मार्च, २०१८ रोजी कर्वे रस्त्यावरील दीक्षित पेट्रोल पंपामागील महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या सिद्धार्थ हॉल या ठिकाणी सायंकाळी ६ वाजता 'मेट्रो संवाद'चे आयोजन करण्यात आले आहे.

सदर संवाद हा सर्वांसाठी खुला आणि विनामूल्य असून यामध्ये सामान्य नागरिकांनी उपस्थित राहून त्यांना भेडसावणारे प्रश्न मेट्रो अधिका-यांसमोर मांडावेत, असे आवाहन महामेट्रोच्या वतीने करण्यात आले आहे.

महामेट्रोचे सल्लागार शशिकांत लिमये व महाराष्ट्र शासनाकडून खास मेट्रो प्रकल्पाच्या कामासाठी नियुक्त केले गेलेले रमेश राव व पुणे मेट्रो प्रकल्पाचे इतर अधिकारी हे यावेळी उपस्थित राहणार असून ते नागरिकांच्या प्रश्नांना उत्तरे देतील. महा मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांच्या वतीने सध्या पिंपरी चिंचवड परिसरात पिंपरी ते शिवाजीनगर तर पुणे परिसरात वनाझ ते रामवाडी या दोन मार्गिकांचे काम वेगाने सुरु आहे. सदर काम सुरू असताना होणा-या वाहतूक अडचणींवर सकारात्मक मार्ग काढण्याच्या उद्देशाने नागरिकांना सोबत घेत महामेट्रो 'मेट्रो संवाद'चे आयोजन करीत आहेत.

------------------------